**पद्यपाठ ९**

**जोडी आमची सोबता**

**ठळक मुद्दे-**

- **कवितेचे नाव-** जोडी आमची सोबता
- **कवी** – महेश केळुसकर
- **कवितेचा प्रकार**-कोकणी गीत
- **कवितेचा विषय**–एका गरीब कष्टकरी जोडप्याचा संवाद
- **कवितेतील भावसौंदर्य**-गरीब परिस्थितीत एकमेकांच्या सुखदु:खाचा विचार त्यामुळे निर्माण होणारा नात्यातला गोडवा
- **कवितेचे नादसैदर्य**-तालबध्द रचना व यमक अलंकारामुळे आलेली नादमयता
- **पूरक वाचनासाठी समांतर आशयाच्या कविता**-साम्यभेद शोधन
- **उपक्रम**-कवितेचे सादरीकरण,संवादलेखन

## प्रस्तावना

ही कविता म्हणजे कोकणातला एक गरीब शेतकरी आणि समजुतदार बायको याच्यातला मालवणी भाषेतील नादमय संवाद आहे. कविता वाचा व ऐका आणि कवितेच्या भाषेचा गोडवा अनुभवा.

# जोडी आमची सोबता

**"हिरवो हिरवो तरवो आमचो दिसता कसो बग**
**करीन म्हंतय अवंदु तुका चांगलोसो नग..."**

**"नग नुको माका, आदी तुमका घेवा घोंगडा**
**उनातानात फिरत आसतास खयव गोवाँवांगडा"**

**लगीन झाल्यापास्ना तुका मेळला सांग गो काय?**
**पाऱ्या तुजी कसली हौस पुरवक मिया नाय"**

**"वगी ऱ्हवा बगया आता, भाकरी खावा आदी**
**कारबाऱ्यानु तुमीच माजी आसात सोना-चांदी."**

**काय बगुन घातलं पा-या, दरिद्रयाक ह्या माळ**
**बारव म्हयने खावची लागता सुकाट आनि डाळ"**

**"असा बोलान करु नकात कमी तेची गोडी**
**शंकर आनि पार्बतीची सोबता आमची जोडी..."**

**कवितेचा आशय:**

शेतकरी बायकोला म्हणतो "भाताची हिरवी हिरवी रोपं तरारून वर आलीयत बघ.भाताचं पीक यंदा छान येईल.त्यातुन तुझ्यासाठी एखादा दागिना करावा असं म्हणतोय."

"दागिना नको आहे मला.त्यापेक्षा तुमच्यासाठीच एखादी घोंगडी घेवूया.दिवसभर गाईगुरांबरोबर उन्हातान्हात फिरत असता."

"लग्न झाल्यापासून काय मिळालं तुला?तुझी कसलीच हैास पुरवू शकलो माही मी "

"आता बोलू नका काही.जेवण करा आधी माझ्यासाठी तुम्हीच माझं सोनं-चांदी आहात."

"माझ्यासारख्या दरिद्री माणसाशी लग्न केलसं काय बघितलस माझ्यात ? बारा महिने तुला सुके मासे आणि डाळच खावी लागतेय."

"असं बोलून तुम्ही तिची गोडी नका कमी करू.आपली शंकर पार्वतिची जोडी आहे.(हेच माझ्यासाठी खरं सुख आहे)"

(हे वाचत असताना कुठला संवाद कुणाच्या तोंडचा आहे हे तुला सहज कळेल.)

**कवितेतील सैंदर्य:**

**भावसैदर्य:-**

कमीत कमी शब्दात मोठा आशय परिणामकारकपणे मांडणे हे कवितेचे वैशिट्य असते.त्यातून आपल्याला नवा विचार देते आणि आपल्या भावनाही जाग्या करते.या कवितेतील प्रत्येक ओळीतून आपल्याला नवराबायकोच्या नात्यातील गोडव्याची प्रचीती येते.दोघेही स्वतापेक्षा जास्त एकमेकांच्या सुखादु:खाचा विचार करतात असे दिसते.बायकोची हैासमैाज पुसता येत नाही.यांची खंत नवऱ्याला वाटते आहे तर उन्हातान्हात गुराढोरांबरोबर हिंडणाऱ्या नवऱ्याला घोंगडी घेण्याची गरज बायकोला वाटते.आपली काळजी घेणारा कारभारी हाच आपलं सोन-चांदी आहे.अशी बायकोची भावना आहे.शंकर पार्वतीसारखं जोडीन,गुण्यागोविंदाने नवऱ्यासोबत राहाणं हेच तिला जास्त महत्वाचं वाटत नवराबायकोचे एक समंजस नाते,अतिशय साध्या संवादातून

ही कविता आपल्यासमोर जिवंत करते

**नादसौंदर्य:-**

ही कविता ऐकत असताना, म्हणत असताना तुला छान वाटलं ना? हा आनंद आपण कवितेच्या नादमयतेमुळे आणि तालबध्दतेमुळं घेऊ शकतो.मालवणी भाषेतील आणखी काही गाणी तू ऐकली असशील.

उदा:हिरव्या हिरव्या रंगाची झाडी घनदाट

सांग गो चेडवा दिसता कसो खंड्याळाचो घाट

याच गाण्याची चाल आपल्या कवितेला चपखल बसते.तुम्ही थोडासा प्रयत्न केलात तर आणखीन वेगळ्या चालीवरही तुम्हाला ही कविता गाता येईल.

प्रत्येक ओळीतल्या शेवटच्या शब्दांचे जुळवलेले यमक आणि तालबध्द शब्दरचना यामुळेच ही कविता गाताना आनंद मिळतो.

**उजळणी प्रश्न**

**प्रश्न-१ ३० ते ४० शब्दात उत्तरे दया**

१)या कवितेतील शेतकऱ्याच्या त्याच्या बायकोबद्दलच्या भावना कोणत्या कोणत्या ओळीवरून त्या आपल्याला कळतात?

२)या कवितेच्या आधारे पार्वतीचे स्वभावाचे वर्णन करा?

**प्रश्न -२ संदर्भासह स्पष्टीकरण करा**

१) नग नुको माका, आदी तुमका घेवा घोँगडा
२) कारबाऱ्यानु तुमीच माजी आसात सोनाचांदी-

**प्रश्न-३ पुढील ओळीतील अलंकार ओळखा**

१) कारबार्यानु तुमीच माजी आसात सोनाचांदी-

**प्रश्न-४ या कवितेतील यमक अलंकाराची उदाहरणे शोधा.**

**प्रश्न-५ पुढील शब्दांसाठी तुमच्या बोलीभाषेत जे शब्द वापरतात ते लिहा**

१)मका २)अवंदु ३)मिया ४)वगी ५) कारबाऱ्यानु

**मुक्त प्रश्न**

१)नवराबायकोच्या नात्यातील प्रेम वेगवेगळया पद्धतीने मांडणाऱ्या २ कविता पुढे दिल्या आहेत त्या वाचा.

१)बाकी क्षेम (पुरुषोत्तम नगरकर)

ऑफीस सुटल्यावर तो घरी येतो

‘हुश्श’ करीत झोकून देतो स्वत:ला आरामखुर्चीत

तेव्हा पन्नासेक विद्यार्थ्यांना

शिकवत, सांभाळत दिवस बेतून

नुकतीच घरी परतलेली ती

चहापोहे करण्यात गुंतलेली

‘मला नाही जमत त्याचे गणित’

म्हणून हात करून त्याची सुट्टीची दुपार

झोपेत पहुडते

तेव्हा ती घेत राहते मुलाचा अभ्यास...

तिची शाळा रविवारीही सुरू

पहिल्या वेळी मुलगा झाल्यावर तो टाकतो निश्वास

‘आता नको काही’ म्हणतो

तिला घ्यायची असते संधी मुलीसाठी

परंतु त्याला नसतो पत्करायचा धोका

‘आपल्या एकुलत्या एकावर होऊ एकाग्र’

तो म्हणतो

तिच्या मनातश: आपल्या मुलाला

पुढे वाटेल का की एखादी बहीण

वा भाऊ असता आपल्याला

तर भरले असते काही वेगळे रंग आयुष्यात

रविवारच्या एखाद्या संध्याकाळी

तिला जावे वाटते मिळून बागेत

तेव्हा मुलगा आणि तो

टी.व्ही वरील देमार चित्रपटात बुडालेले

तीही मग पाहू लागते

पडद्यावरची हालती चित्रे

अन् हळुहळू पसरू लागते रात्र सर्वत्र

कधी तो स्वत:हून आणतो

तिच्यासाठी सुवासिक फुलांचा गजरा

तेव्हा ती नकळत खांद्यावर मस्तक विसावताना

ती विसरते स्वत:ला

आणि त्यालाही

'तू सुखी आहेस ना माझ्या संसारात'

तो विचारतो

'तू नाही म्हणालास -

'आपल्या संसारात' ती उद्गारते

'एवढीच उणीव, बाकी क्षेम!'

२)नसतेस घरी तु जेव्हा (संदीप खरे) ही कविता येथे ऐका

http://www.aathavanitli-gani.com/Song/Nasates_Ghari_Tu_Jevha

या सर्व कवितांमध्ये काही गोष्टी समान आहेत आणि काही वेगळ्या त्याची यादी करा

२)या विषयावरील आणखी काही कविता शोधा.त्यातील तुम्हाला आवडलेली कविता वर्गात सादर करा.

३)तालबध्द वाचनातूनही या कवितांचा आनंद घेता येतो.या कवितांचे वेगवेगळया पद्धतीने वाचन करून बघ.त्यातली कोणती पद्धत ऐकणाऱ्यांना जास्त चांगली वाटते व का?

४)'जोडी आमची सोबता' या कवितेतील प्रसंगावर आधारित छोटी नाटिका लिहा.त्यामधे संवाद बरोबरच रंगसूचना(पात्राच्या हालचाली साठीच्या सूचना )आणि नेपथ्याच्या सूचनाही लिहा.

५)पुढे दिलेली कविता वाचा व ऐका.

http://www.aathavanitli-gani.com/Song/Pota_Purata_Pasaa_Pahije

पोटापुरता पसा पाहिजे.

## पोटापुरता पसा पाहिजे

ग.दि. माडगुळकर

पोटापुरता पसा पाहिजे नको पिकाया पोळी

देणा-याचे हात हजारो दुबळी माझी झोळी

हवास तितका पाडी पाऊस देवा वेळोवेळी

चोचीपुरता देवो दाणा माय माऊली काळी

एक वीतिच्या वितेस पुरते तळ हाताची थाळी

देणा-याचे हात हजारो दुबळी माझी झोळी

महाल गाद्या नकोत नाथा माथ्यावर दे छाया

गरजेपुरती देई वसने जतन कराया काया

गोठविणारा नको कडाका नको उन्हाची होळी

देणा-याचे हात हजारो दुबळी माझी झोळी

होते तितुके देई याहुन हट्ट नसे गा माझा

सौख्य देई वा दु:ख ईश्वरा रंक करी वा राजा

अपुरेपण हि न लगे, न लगे पस्तायाची पाळी

देणा-याचे हात हजारो दुबळी माझी झोळी

जोडी आमची सोबता या कवितेतील पार्वतीचे विचार व वागणे हे या कवितेतील विचारांप्रमाणे आहे असे तुम्हाला वाटते का?उदाहरण देवून तुमचे म्हणणे स्पष्ट करा.